# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## वार्षिक सर्वसाधारण सभा

उपरोक्त संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक 16 मार्च 1997 रोजी सायंकाळी ठिक 4:00 वाजता शिरोडकर हायस्कूल, परेल येथ आयोजित केली होती. परंतू शिरोडकर हायस्कूल, परेल यांच्या काही अडचणीमुळे जागा उपलब्ध होऊ शकली नाही. तरी सभा पुढे श्री प्रताप विठोबा राणे यांच्या घरी (खोलीवर) त्याच दिवशी 5:30 वाजता घेण्यात आली. त्याचे इतिवृत्त पुढील प्रमाणे –

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री सुनिल सदानंद राणे | 12. श्री गुरुनाथ धोंडू राणे |
| 2. श्री वासुदेव बाबू राणे | 13. श्री उत्तम वामन राणे |
| 3. श्री सुरेश रघुनाथ राणे | 14. श्री रमेश रघुनाथ राणे |
| 4. श्री साबाजी त्रिंबक राणे | 15. श्री प्रताप विठोबा राणे |
| 5. श्री म. श्री. राणे | 16. श्री शंकर बाळकृष्ण राणे |
| 6. श्री पा. एस. राणे | 17. श्री एकनाथ अनंत राणे |
| 7. श्री सचिन झिलू राणे | 18. श्री उदय भगवान राणे |
| 8. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 19. श्री मधुकर संभाजी राणे |
| 9. श्री अशोक दत्ताराम राणे | 20. श्री यशवंत तुकाराम सावंत |
| 10. श्री विठोबा नाना राणे | 21. श्री श्रीधर आत्माराम राणे |
| 11. श्री दत्ताराम नान राणे | 22. श्री रविन्द्र भगवान राणे |

फळसेवाडी हितकारी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षस्थान श्री प्रताप विठोबा राणे यांनी भुषविले.

सभेची सुरवात होण्यापूर्वी अहवालसाली मृत झालेल्या पुढील व्यक्तीना श्रध्दांजली वाहण्यात आली.

1) कै बालशिवाजी राणे, 2) कै गणपत बाबू सावंत, 3) कै भगवान बाबू सावंत, 4) कै रुक्मीनी तुकाराम सावंत,
5) कै बाळकृष्ण आबाजी राणे, 6) कै रामचंद्र पांडूरंग साटम, 7) कै सुभद्राबाई नारायण साटम,
8) कै वामन राजाराम राणे, 9) कै विजय भगवान राणे, 10) कै सुमती बाळा राणे,
11) कै यमुनाबाई नारायण राणे व 12) कै प्रभावती विठोबा राणे

यानंतर वाडीतील नवोदित कवी श्री उत्तम वामन राणे तसेच वाडीतील पुढील मान्यवर व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. श्री साबाजी त्रिंबक राणे, श्री दत्ताराम विष्णु साटम, श्री अविनाश कृष्णाजी राणे.

**<u>विषय क्रमांक 1</u>**

यांनतर सभेच्या कामकाजास सुरवात करण्यात आली. दिनांक 02 एप्रिल 1995 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून मंजूर करणे.

दिनांक 02 एप्रिल 1995 रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून सर्वानुमते मंजूर करण्यात आले.

पुर्नलिखित इतिवृत्त

मुळ दस्तऐवज : MR-04-(63 to 66)

**विषय क्रमांक 2**

सन 1995 ते 97 या कालावाधीतील अहवालास मंजूरी घेणे

या अहवालाच्या प्रती सभेपूर्वी सर्वानाच देण्यात आल्या होत्या त्यामुळे या अहवालाचे वाचन सभेच्या वेळी न करता अहवालातील पुढील बाबींवर चर्चा करण्यात आली.

फळसेवाडी शाळा क्रमांक 2 ते वाडीस जोडणारा रस्ता यांचे काम 15 दिवसांत होणे आवश्यक असल्याचे श्री प्रताप विठोबा राणे यांनी सांगितले. त्याबाबत त्यांनी स्थानिक रहिवाश्यांना सूचना दिल्या असल्याचे सांगितले. त्याप्रमाणे नळपाणी योजनेबाबत श्री प्रताप विठोबा राणे यांनी माहीती दिली. त्यानंतर अहवालातील इतर बाबींवर चर्चा होऊनअहवाल मंजूर करण्यात आला.

**विषय क्रमांक 3**

सन 1995 – 97 जमाखर्चास मंजूरी देणे

सन 1995 – 97 चा जमाखर्चाचा तपशील सभेपुढे सादर करण्यात आला त्याची सर्वानुमते नोंद घेण्यात आली. मागील तीन वर्षाची सभासद वर्गणी न मिळाल्याने यापुढे खजिनदारांनी सर्वांची वर्गणी घेऊन तो हिशेब व्यवस्थित ठेवावा असे ठरले.

**विषय क्रमांक 4**

पुढील कालावधीसाठी कार्यकारीणीची निवड करण्यात आली

या विषयावर चर्चा होऊन असे ठरले की संस्थेची बरीचशी कामे पूर्ण करावयाचीअसल्याने पुढील कालावधीसाठी हे कार्यकारी मंडळ ठेवण्यात यावे.

**विषय क्रमांक 5**

मा अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळच्या विषयावर चर्चा

मा नामदार श्री नारायण तातू राणे यांचा सत्कार करण्यासंबधी सभेत चर्चा करण्यात आली. चर्चेत असे ठरले की सत्कार हा विषय आता जुना झाल्यामुळे आता सत्काराला काही अर्थ उरणार नाही, त्यापेक्षा शिरोडकर हॉलला दिनांक 13 एप्रिल रोजी वाडीतील रहिवाश्यांचे स्नेहसंमेलन आयोजित करावे व या दिवशी प्रमुख अतिथि म्हणून श्री नारायण राणे यांना बोलवावे. यासाठी प्रत्येक सभासद, विवाहीत मुली, नोकरदार भगिनी यांनी देखील देणगी देऊन या कार्यक्रमास हातभार लावावा व कार्यक्रमास उपस्थित राहावे.

यासाठी एक समिती नेमण्यात आली ती पुढील प्रमाणे –

1) श्री साबाजी त्रिंबक राणे
2) श्री पांडूरंग सावजी राणे
3) श्री वासुदेव बाबू राणे
4) श्री गुरुनाथ धोंडू राणे
5) श्री एकनाथ अनंत राणे
6) श्री अशोक दत्ताराम राणे

पुर्नलिखित इतिवृत्त

मुळ दस्तऐवज : MR-04-(63 to 66)

या सभेच्या वेळी चहापान व्यवस्था श्री प्रताप विठोबा राणे व कुटुंबिय यांनी केल्यामुळे त्यांचे आभार मानण्यात आले. यानंतर  उपस्थितांचे आभार मानून सभा बरखास्त करण्यात आली.

---